आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२९ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या मुदतीच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून अर्ज दाखल

- अखेरच्या दिवशीही उमेदवार याद्या जाहीर / अनेक ठिकाणी उमेदवारी न मिळालेल्यांची उघड नाराजी

- भारत - स्पेन मैत्री वृद्धिंगत करण्यावर उभय राष्ट्रांचा भर राहील, अशी स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांची मुंबईतल्या कार्यक्रमात ग्वाही

- धनत्रयोदशीनिमित्त राज्यात सर्वत्र धन, धान आणि धन्वंतरी पूजन

- आरोग्याशी संबंधित १२ हजार ८५० रुपये कोटी खर्चाच्या विविध विकास कामांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि भूमिपूजन

**आणि**

- ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वीणा देव यांचं निधन

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपापले अर्ज दाखल केले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज शक्तिप्रदर्शन करत कामठी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी साकोलीतून अर्ज भरला. संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर पश्चिममधून,

भाजपाच्या हेमंत रासने यांनी पुण्याच्या कसबा पेठ मतदारसंघातून, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील टिंगरे यांनी वडगांव शेरीतून उमेदवारी अर्ज दाखल केला.

काँग्रेसचे गोपाल अग्रवाल यांनी गोदिया विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला. मिलिंद देवरा यांनी वरळी मतदारसंघातून, धुळे शहर मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल गोटे यांनी, तसंच एमआयएमचे फारुख शाह यांनी, काँग्रेसचे विकास ठाकरे यांनी नागपूर पश्चिमधून, श्वेता महाले यांनी चिखलीतून, शिवसेनेचे दीपक केसरकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजन तेली यांनी सावंतवाडी मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

अकोला पश्चिम मतदारसंघातून काँग्रेसचे साजिद खान तसंच वंचित बहुजन आघाडीकडून झिशान हुसैन यांनी अर्ज दाखल केला. बेलापूरमधून भाजपाच्या मंदा म्हात्रे, दिंडोशीतून संजय निरुपम, रत्नागिरी मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बाळ माने, अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून प्रहारचे सुगत चंद्रिकापुरे, इस्लामपूरमधून राष्ट्रवादी काँग्रेसचे निशिकांत पाटील, तासगाव-कवठे महांकाळमधून संजय पाटील, महाड मधून भरत गोगावले आणि नागपूर उत्तर मतदारसंघातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नितीन राऊत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षानं आज जाहीर केलेल्या यादीनुसार उमरेडमधून सुधीर पारवे, तर मीरा भाईंदरमधून नरेंद्र मेहता यांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं माढा विधानसभा मतदारसंघातून अभिजित पाटील, मुलुंडमधून संगीता वाजे, मोर्शी मधून गिरीश कराळे, पंढरपूरमधून अनिल सावंत, मोहोळमधून राजू खरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं

भाजपमधून आलेल्या तृप्ती सावंत यांना वांद्रे पूर्व मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे.

दुसरीकडे उमेदवारीसाठी इच्छुक पण संबंधित राजकीय पक्षाकडून तिकिट न मिळालेले काही उमेदवार नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. **पालघरमधे** निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक श्रीनिवास वनगा यांनी माध्यमांसमोर नाराजी व्यक्त केली. काल संध्याकाळपासून ते बेपत्ता झाले असल्याचं आमच्या पालघरच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पोलीस वनगा यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, भाजपाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी बोरीवलीतून, माजी आमदार अतुल शहा यांनी मुंबादेवी तर घाटकोपर पूर्वमधून भाजपाच्याच प्रकाश मेहता यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर विधानसभा मतदारसंघातल्या भाजपच्या नेत्या राजश्री ऊर्फ उल्का विश्वासराव यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. भाजपात काम करणं कठीण झालं असल्यानं भाजपा प्रदेशाध्यक्षांकडे राजीनामा दिल्याचं कालच त्यांनी जाहीर केलं होतं.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

भारत – स्पेन दरम्यान दृढ मैत्री संबंध असून ते वृद्धिंगत करण्यावर उभय राष्ट्रांचा भर राहील असं स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांनी म्हटलं आहे. मुंबईत चौथ्या स्पेन- भारत मंचाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. शाश्वत भविष्याच्या दृष्टीनं या दोन्ही देशांचं सहकार्य सकारात्मक पुढाकार ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्याच्या वाढत्या भूराजकीय तणावाच्या काळात मानवी हक्कांचं आणि नागरिकांचं संरक्षण या बाबींवर लक्ष दिलं पाहिजे असं ते म्हणाले. व्यापार, गुंतवणूक त्याचप्रमाणे डिजिटल तंत्रज्ञान आणि त्यानं निर्माण झालेली आव्हानं या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. या मंचाची संकल्पना "सध्याच्या भूराजकीय आणि तंत्रज्ञान विषयक आव्हानांसंदर्भात स्पेन – भारत भागीदारी : नवी क्षितिजं, नवीन शक्यता" अशी आहे.

**<><><><><>**

देशभरात आज दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजेच धनत्रयोदशी साजरी होत आहे. आजच्या दिवशी धनाची आणि धानाची तसंच देवांचे वैद्य असलेल्या धन्वंतरींची पूजा आज केली जाते. धणे आणि गूळ यांचा नैवेद्य दाखवला जातो. या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. आज साजऱ्या होणाऱ्या आयुर्वेद दिनानिमित्तही प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात शुभेच्छा दिल्या आहेत. निरोगी जीवनशैलीसाठी आयुर्वेद उपयुक्त ठरतो. भगवान धन्वतरींची जयंती ही आयुर्वेदाच्या उपयुक्ततेशी आणि योगदानाशी निगडित असल्याचं प्रधानमंत्री आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

देशातले नागरिक निरोगी असतील तर देशाच्या प्रगतीला गती मिळते, त्यामुळेच देशात आरोग्य विषयक पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याला

आपल्याला सरकारनं प्राधान्य दिलं आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.  धन्वंतरी जयंती आणि नवव्या आयुर्वेद दिनानिमित्त प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात आरोग्य क्षेत्राशी संबंधित सुमारे १२ हजार ८५० कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी झाली, त्यावेळी ते बोलत होते. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, निदान सुविधा, परवडणारी औषधं आणि उपचार, छोटी शहरं आणि खेड्यांमधे पुरेशा आणि योग्य आरोग्यविषयक सेवा तसंच आरोग्य क्षेत्रात तंत्रज्ञानाचा विस्तार असे पाच प्रमुख स्तंभ आखून आपलं सरकार काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक डॉक्टर वीणा देव यांचं आज पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. त्या ७५ वर्षांच्या होत्या. गेले काही दिवस  त्या आजारी होत्या. वीणा देव या दिवंगत इतिहास अभ्यासक आणि लेखक गो. नी. दांडेकर यांच्या कन्या तर अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर आज रात्री ९ च्या सुमारास पुण्याच्या वैकुंठ स्मशानभूमीमध्ये अंत्य संस्कार करण्यात येणार असल्याचं त्यांच्या निकटवर्तियांनी सांगितलं.

पुण्यातल्या शाहू मंदिर महाविद्यालयात त्यांनी ३२ वर्षं मराठीचं अध्यापन केलं. ‘मराठी कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपे’ या विषयावर सादर केलेल्या प्रबंधासाठी त्यांना डॉक्टरेट मिळाली. लेखन, संकलन आणि संपादन हे साहित्याचे विविध प्रकार त्यांनी लीलया हाताळले.

**'**कधीकधी**'**, **'**परतोनी पाहे**'**, **'**स्त्रीरंग**'**, **'**विभ्रम**'**, **'**स्वान्सीचे दिवस**'** ही त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. त्यांनी गो. नी.दांडेकर यांच्यावर लिहिलेल्या **'**आशक मस्त फकीर**'** या पुस्तकाला राज्य शासनाचा उत्कृष्ट ललित साहित्य निर्मितीचा पुरस्कार

मिळाला. राज्य शासनाच्या मराठी राजभाषा सल्लागार समितीवर सदस्य म्हणून त्यांनी काम केलं. त्यांना मोरया गोसावी जीवनगौरव पुरस्कार तसेच साईरंग प्रतिष्ठानतर्फे कर्तृत्वगौरव पुरस्कार देण्यात आला.

**<><><><>**

बुलडाणा जिल्ह्यातल्या नागपूर मुंबई महामार्गावर नांदुरा शहरालगत आज सकाळी ट्रॅक्टर आणि ट्रकची धडक होऊन झालेल्या अपघातात २ जण जागीच ठार तर ८ जण गंभीर जखमी झाले. हा ट्रॅक्टर कापूस वेचणीसाठी जाणाऱ्या मजुरांची वाहतूक करत होता. जखमींना मलकापूर तसंच खामगाव इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><>**

जागतिक अस्थिरतेच्या परिणामांच्या पार्श्वभूमीवर आजही भारतीय शेअर बाजारांमध्ये वाढ दिसून आली. दुपारच्या सत्रापर्यंत घट होत असताना बाजार बंद होताना वाढ पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ३६४ अंकांची वाढ झाली आणि तो ८० हजार ३६९ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १२८ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ४६६ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

नाशिक इथल्या महाराष्ट्र पोलीस अकादमीचा १२५ वा दीक्षांत सोहळा आज पार पडला. या सोहळ्यानंतर १०८ पुरुष आणि ३ महिला असे एकूण १११ पोलीस उपनिरीक्षक आपलं प्रशिक्षण पूर्ण करून पोलीस पथकात दाखल झाले.

राज्याचे दहशतवादविरोधी पथकाचे अपर पोलिस महासंचालक नवल बजाज हे या सोहळ्याला उपस्थित होते.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे अहमदाबाद इथं झालेल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडनं भारतापुढे विजयासाठी २३३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडचा सामन्यातला एक चेंडू बाकी असताना २३२ धावांवर आटोपला. ब्रुक हॅलिडेच्या ८६ धावांमुळे त्यांच्या धावसंख्येला आकार मिळाला. भारतातर्फे दीप्ती शर्मानं ३, प्रिया मिश्रानं २, तर सायमा ठाकूर आणि रेणुका सिंग यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हां, भारताच्या २४ षटकात २ बाद १०२ धावा झाल्या होत्या. तीन सामन्यांच्या या एकदिवसीय मालिकेत दोन्ही संघांनी आधीचे एक एक सामने जिंकून बरोबरी साधली असल्यानं आजचा सामना जिंकून मालिका जिंकण्याचा प्रयत्न दोन्ही संघांचा असेल.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसात, राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**